संदर्भ – 1) या कार्यालयाचे आदेश क्र.का 9/आस्था 2/माहितीचा अधिकार/61-200, दि.3/1/2003
2) या कार्यालयाचे आदेश क्र.का 9/आस्था 2/माहितीचा अधिकार/901, दि. 5/3/2004
3) या कार्यालयाचे आदेश क्र.का 9/आस्था 2/ममाअ/3718/2005, दि. 16/9/2005
4) या कार्यालयाचे आदेश क्र.का 9/आस्था 2/माहिती अधिकारी/08/3652, दि. 1/9/2008
5) या कार्यालयाचे आदेश क्र.का 9/आस्था 2/माहिती अधिकारी/08/772, दि. 4/3/2009
6) या कार्यालयाचे आदेश क्र.का 9/आस्था 2/माहिती अधिकारी नियुक्ती/2877,दि. 9/10/2009

---

क्र.का9/आस्था-2/के.मा.अ./2425/14
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
दिनांक :- 20/8/2014

**विषयः-** कैंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम -2005 अन्वये शासकीय महिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी यांची नियुक्ती करणे बाबत.

**आदेश**

ज्या अर्थी, संदर्भात नमुद 1 ते 6 आदेशान्वये कैंद्रीय माहीती अधिकार सन 2005 मधील कलम 5(1) मधील तरतुदिनुसार नोंदणी व मुद्रांक विभागातर्गत असलेल्या कार्यालयातील अधिकारी यांना माहिती अधिकार नियम 2005 अन्वये कर्तव्य व जबाबदा-या पार पाडण्यासाठी शासकीय माहिती अधिकारी म्हणून घोषीत करण्यात आले आहे,

आणि ज्या अर्थी, नोंदणी व मुद्रांक विभागामधील काही कार्यालयांचे कार्यक्षेत्रामध्ये बदल झाला आहे व काही कार्यालयाचे पत्यामध्ये बदल झाला आहे व काही कार्यालये नव्याने निर्माण झाली असुन सदर कार्यालयासाठी शासकीय माहिती अधिकारी घोषीत करणे आवश्यक आहे,

आणि ज्या अर्थी, सह जिल्हा निबंधक कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांचे निर्णयाविरुध्द नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांना प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून यापुर्वीच घोषीत करण्यात आले आहे, तथापि, जनतेच्या सोई व हित हि बाब विचारात घेवुन त्यामध्ये बदल करण्याची अवश्यकता विभाग प्रमुख या नात्याने निम्नस्वाक्षरीकार यांचे मत झाले आहे,

त्याअर्थी वरील सर्व घटनांचा/बाबींचा एकत्रीत विचार करुन सध्या अस्तित्वात असलेल्या सर्व आदेशांचे अधिक्रमण करुन खालील तत्क्यात नमुद केल्याप्रमाणे विभागातील प्रत्येक कार्यालयासाठी, माहिती अधिकार नियम 2005 अन्वये कर्तव्य व जबाबदा-या पार पाडण्यासाठी शासकीय माहीती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी घोषीत करण्यात येत आहेत,

| अ.क्र. | कार्यालय | जन माहिती अधिकारी | अपीलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|
| 1 | दुय्यम निबंधक | संबंधित दुय्यम निबंधक | संबंधित जिल्हयाचे सह जिल्हा निबंधक |
| 2 | विवाह अधिकारी | संबंधित विवाह अधिकारी | संबंधित जिल्हयाचे सह जिल्हा निबंधक |
| 3 | सह जिल्हा निबंधक | संबंधित सह जिल्हा निबंधक कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-2 | संबंधित जिल्हयाचे सह जिल्हा निबंधक |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | नोंदणी उपमहानिरीक्षक | संबंधित कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-2 | संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक |
| 5 | नोंदणी महानिरीक्षक | सहाय्यक नोदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.9 | नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय) |
| 6 | प्रधान मुद्रांक कार्यालय | मुद्रांक अधिक्षक | अपर मुद्रांक नियंत्रक |
| 7 | शासकीय छायाचित्र नोदणी कार्यालय, पुणे | प्रशासकीय अधिकारी वर्ग-2 | व्यवस्थापक, शासकीय छायाचित्र नोदणी कार्यालय, पुणे |
| 8 | मुंबई विभागातील मुद्रांक जिल्हाधिकारी | संबंधित कार्यालयातील दुय्यम निबंधक, श्रेणी-1 | संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी |
| 9 | उपसंचालक/ सहाय्यक संचालक, नगररचना मूल्यांकन | संबंधित उपसंचालक /सहाय्यक संचालक, नगररचना, मूल्यांकन | सह संचालक, नगररचना, मूल्यांकन, महाराष्ट्र राज्य,पुणे |
| 10 | सह संचालक, नगररचना, मूल्यांकन, महाराष्ट्र राज्य,पुणे | नगररचनाकार | सह संचालक, नगररचना, मूल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे. |

वरीलप्रमणे नियुक्त प्रधिका-याने केलेल्या नियुक्ती प्रमाणे आपल्ये कर्तव्य व जबाबदा-या पार पाडाव्यात.

सही/- श्रीकर परदेशी
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

1) सर्व संबंधीत शासकीय माहिती अधिकारी / अपीलीय अधिकारी
2) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
3) सर्व सह जिल्हा निबंधक
4) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे

प्रत

5) उप सचिव, महसुल व वन विभाग (म-1) मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी
6) सर्व विभागीय आयुक्त यांना माहितीसाठी
7) सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हानिबंधक यांना माहितीसाठी.

निर्गमित

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणेकरिता